नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक ५० * * अमरावती * गुरुवार, दिनांक २१ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :
सहकार विभागाने राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या आहेत. महाराष्ट्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली असल्याने या निवडणुका ३० सप्टेंबरपर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनानुसार, राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची सद्यस्थिती विचारात घेऊन महाराष्ट्र सहकारी संस्था नियम २०१४ मधील नियम ४ मध्ये नमुद केलेल्या 'अ' आणि 'ब' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात येत आहेत. अतिवृष्टीमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# रेड्डींचा धक्का

परवा सरकारने एनडीएचे उमेदवार म्हणून उपराष्ट्रपती पदासाठी सीपी राधाकृष्णन यांची निवडणुकीसाठी घोषणा केली. सरकारकडून आवाहन करण्यात आलेले आहे की याच उमेदवाराला सर्वांनी मतदान आणि समर्थन करा. वास्तविक पाहता राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभापती यांची निवड सर्व संमतीने झाली पाहिजे. इंग्लंडची राज्यघटना किंवा तिथल्या प्रथा परंपरेनुसार असेच होत असते. पण भारत स्वतंत्र झाल्यापासून आतापर्यंत एकमताने निवडीची अद्यापपर्यंत प्रथा नाही. सध्या विविध कारणांमुळे सर्व विरोधी पक्ष एकत्र आलेले आहेत. आम आदमी पक्षासह, तृणमूल काँग्रेस हे सुद्धा इंडिया आघाडी बरोबर आहेत. सरकारने अतिशय हुशारीने दक्षिण भारतातील किंबहुना तामिळनाडूचे असलेले सीपी राधाकृष्णन यांच्या नावाची घोषणा केल्यानंतर एनडीएचे प्रमुख पक्ष जे काय आहेत त्यांनी आपला उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून येईल असा विश्वास व्यक्त केला होता. काँग्रेस आणि इतर इंडिया आघाडी मधील पक्षांनी अतिशय हुशारीने राजकारणाशी संबंध नसलेला आणि दक्षिण भारतातील उमेदवार उपराष्ट्रपतीपदासाठी निवडलेला आहे. इंडिया आघाडीचे उमेदवार आंध्रप्रदेशचे आहेत. त्यामुळे तेलगू अस्मितेच्या नावाखाली आंध्र आणि तेलंगणा मधील बहुसंख्य मते त्यांनाच मिळतील, असा त्यांनी होरा बांधला असावा. आंध्र प्रदेशांमध्ये रेड्डी विरुद्ध कम्मा यांची लढाई होत असते. चंद्राबाबू नायडू हे कम्माच्या समर्थनासाठी निवडून येतात. त्यांना रेड्डी समाजाची मते कधीच मिळत नाहीत, पण तेलगु अस्मितेपायी त्यांच्या पक्षाची काही मते फुटूही शकतात. हे सर्व लक्षात घेऊन आणि तेलगू अस्मितेला छेडले किंवा काढले तर त्याचा परिणाम चंद्राबाबू नायडू यांच्या राजकारणावरही होऊ शकतो. त्यानंतर पुन्हा त्याचा फायदा इंडिया आघाडीला होऊ शकतो यात शंकाच नाही. या सगळ्या गोष्टींचा सर्वांगीण विचार करून इंडिया आघाडीने अनेक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि सर्वोच्च न्यायालयाच्या जस्टीसला म्हणजेच न्यायाधीशाला म्हणजेच सुदर्शन यांना निवडून एनडीएला धक्का तर दिलाच आहे. एकूण पाहिले तर एनडीए मधील काही असंतुष्ट आणि आंध्रसह तेलंगणामध्ये राहणारे खासदार कोणता निर्णय घेतात याची धाकधूक एनडीलाही असावीच. आज जरी विजयाचे पारडे एनडीएकडे झुकले असले, तरीही मुकाबला चुरशीचा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# मुंबईला आज दिलासा?



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २० :
तमाम महाराष्ट्राच्या काळजात धडकी भरवणाऱ्या पावसाबद्दल एक महत्त्वाची अपडेट आली आहे . हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार ठाण्यासह चार जिल्ह्यांना आज पुन्हा एकदा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.
मुंबईसह पाच जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला. मात्र, मुंबई आणि ठाणेकरांना दिलासा देणारी बातमी सुद्धा या अंदाजात आहे.
हवामान विभागाच्या म्हणण्यानुसार उद्यापासून मुंबईला उसंत मिळू शकते. या ठिकाणी उद्या यलो अलर्ट देण्यात आला. त्यामुळे उद्यापासून येथे हलका पाऊस येऊ शकतो.
मुंबईत बुधवारी मुसळधार पावसाचा तिसरा दिवस होता. २४ तासांत येथे ३०० मिमी पाऊस पडला. मुंबईत सलग तिसऱ्या दिवशी शाळा, महाविद्यालये आणि सरकारी आणि निमसरकारी कार्यालये बंद राहिली. मुंबईतील ३४ गाड्या (१७ जोड्या) लोकल ट्रेन रद्द करण्यात आल्या आहेत. २५० हून अधिक उड्डाणांवरही परिणाम झाला आहे.
मुंबईतील २ मोनोरेलमधून मंगळवारी संध्याकाळी सुमारे ८०० लोकांना वाचवण्यात आले. म्हैसूर कॉलनी रेल्वे स्थानकाजवळ सायंकाळी ६ वाजता एक मोनोरेल उंच ट्रॅकवर अडकली. त्यातील ५८२ प्रवाशांना क्रेनच्या मदतीने खिडकी तोडून सुमारे ४०-५० फूट उंचीवरून वाचवण्यात आले. एमएमआरडीएने सांगितले की, वाढत्या गर्दीमुळे हे घडले.
रेल्वेची मूळ वजन क्षमता १०४ आहे, जी काल वाढून १०९ टन झाली. ५ टन अतिरिक्त वजन (प्रवाशांचे) होते. त्याच वेळी, आचार्य अत्रे आणि वडाळा मोनो रेल स्टेशनवरून २०० लोकांना बाहेर काढण्यात आले. वीज आणि एसी बंद असल्याने डब्यांमध्ये गुदमरल्यासारखे होत होते. बाहेर पाऊस पडत होता आणि अंधार वाढत होता. जेव्हा ट्रेन धोकादायकपणे झुकली, तेव्हा लोकं प्रार्थना करत होते.

एनडीए उमेदवार राधाकृष्णन
## यांचा अर्ज दाखल
उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक



■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २० :
एनडीएचे उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार सीपी राधाकृष्णन यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यापूर्वी त्यांनी संसदेच्या परिसरात असलेल्या महात्मा गांधीजींच्या पुतळ्याला पुष्प अर्पण केले. त्यांच्यासोबत २० प्रस्तावक आणि २० समर्थकांसह सुमारे १६० सदस्य उपस्थित होते.
१७ ऑगस्ट रोजी झालेल्या भाजप संसदीय पक्षाच्या बैठकीत त्यांच्या नावावर एकमत झाले. भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांनी पत्रकार परिषदेत राधाकृष्णन यांच्या नावाची घोषणा केली.
त्यांचा सामना विरोधी आघाडीचे उमेदवार निवृत्त सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी सुदर्शन रेड्डी यांच्याशी होईल. विशेष म्हणजे दोन्ही उमेदवार दक्षिणेतील आहेत. रेड्डी २१ ऑगस्ट रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल करतील.
उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी ९ सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे. त्याच दिवशी मतमोजणीही होईल. नामांकन दाखल करण्याची शेवटची तारीख २१ ऑगस्ट आहे. २५ ऑगस्टपर्यंत नामांकन मागे घेता येईल.

## ठाकरेंनी राजकीयकरण केल्याने जनतेने नाकारले

बेस्ट निवडणूक निकालावर सीएम फडणवीसांची प्रतिक्रिया

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २० :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात माध्यमांशी संवाद साधत असताना, विविध विषयांवर भाष्य केले. विशेष म्हणजे, बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीवर भाष्य करत त्यांनी ठाकरेंना टोला लगावला.
ठाकरे बंधूंनी या निवडणुकीचे राजकीयकरण केले, त्यामुळे जनतेने त्यांना नाकारले, अशी टीका त्यांनी केली. तसेच संजय शिरसाट सिडको अध्यक्ष असताना मोठा घोटाळा झाल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला आहे. यावरही मुख्यमंत्र्यांनी प्रतिक्रिया दिली.
बेस्टच्या पतपेढीच्या निवडणुकीचे राजकीय करण करण्यात येऊ असे माझे मत होते. पण ठाकरेंनी त्याचे राजकीय करण केले. पतपेढीच्या निवडणुकीला शशांक राव आणि प्रसाद लाड उभे होते. दोघेही आमचेच आहेत. पण त्यांनी ठाकरें बंधू एकत्र, ठाकरे ब्रँड निवडून येणार, अशाप्रकारे त्यांनी राजकीय करण केले. ते



लोकांना आवडलेले दिसत नाही. त्यामुळे त्यांना एकही जागा मिळालेली नाही. या निवडणुकीत तरी त्यांना लोकांनी नाकारल्याचे चित्र आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

**रोहित पवारांनी पुरावे द्यावे**

रोहित पवार यांनी संजय शिरसाट यांच्या ५ हजार कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप केला आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारले असता, रोहित पवारांनी पुरावे दिले पाहिजेत, अशी प्रतिक्रिया दिली. रोहित पवारांसारखील मंडळी रोज आरोप करत असतात. विना पुराव्याचे आरोप करणे योग्य नाही. पुराव्यानिशी आरोप केल्यास त्यावर परिणात्मक उत्तर मिळते. त्यांच्याकडे काय पुरावे आणि नेमके प्रकरण काय आहे? त्याबद्दल माहिती नाही, असे फडणवीस म्हणाले.

**राज्यातील पूरस्थिती नियंत्रणात**

राज्यातील पूरस्थितीबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, पूरस्थिती बऱ्यापैकी नियंत्रणात आलेली आहे. काही भागात अजूनही पाऊस जोरात सुरू असून, आजही रेड अलर्ट आहे. आपत्ती व्यवस्थानपनाच्या संदर्भातील सर्वतोपरी काळजी घेण्यात आलेली आहे. इशारा पातळीच्यावर नद्या गेलेल्या आहेत, तिथे धरणातून विसर्ग वाढवून व्यवस्थापन करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

अटक किंवा ३० दिवसांसाठी ताब्यात असल्यास
## पीएम, सीएम किंवा मंत्र्यांचे पद जाणार

५ वर्षांहून अधिक शिक्षेच्या गुन्ह्यांमध्ये लागू, विधेयकाला विरोध

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २० :
गृहमंत्री अमित शहा यांनी बुधवारी लोकसभेत ३ विधेयके सादर केली. त्यात अशी तरतूद आहे की जर पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा कोणत्याही मंत्र्याला ५ वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षा असलेल्या गुन्ह्यासाठी अटक केली गेली किंवा ३० दिवसांसाठी ताब्यात ठेवले गेले तर त्यांना राजीनामा द्यावा लागेल.
लोकसभेत तिन्ही विधेयकांविरुद्ध बराच गोंधळ झाला. विरोधकांनी तिन्ही विधेयके मागे घेण्याची मागणी केली. काँग्रेस आणि एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी निषेध केला. समाजवादी पक्षाने या विधेयकांना न्यायविरोधी, संविधानविरोधी म्हटले. यावर शहा यांनी ही विधेयके संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवण्याची मागणी केली.
दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांनी ६ महिने आपल्या पदाचा राजीनामा दिला नाही आणि तामिळनाडूचे मंत्री व्ही. सेंथिल बालाजी यांनी २४१ दिवस ताब्यात घेऊन तुरुंगात टाकल्यानंतरही राजीनामा दिला नाही. केजरीवाल हे पदावर असताना अटक झालेले पहिले मुख्यमंत्री होते.
केंद्र सरकारच्या मते, सध्या केंद्रशासित प्रदेशांमध्ये केंद्रशासित प्रदेश सरकार कायदा, १९६३ (१९६३ चा २०) अंतर्गत गंभीर गुन्हेगारी आरोपांवर अटक केलेल्या आणि ताब्यात घेतलेल्या मुख्यमंत्री किंवा मंत्र्याला पदावरून काढून टाकण्याची कोणतीही तरतूद नाही. म्हणून, अशा प्रकरणांमध्ये मुख्यमंत्री किंवा मंत्र्यांना काढून टाकण्यासाठी कायदेशीर चौकट प्रदान करण्यासाठी केंद्रशासित प्रदेश सरकार कायदा, १९६३ च्या कलम ४५ मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. विरोधकांनी मात्र विरोध दर्शवला आहे.

आमदार केचे यांच्या आरोपांनी गाजला
## आर्वीचा दहीहंडी कार्यक्रम



■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २० :
वर्ध्याच्या आर्वीत भाजपातील खदखद दहीहंडी कार्यक्रमाच्या मंचावर विधानपरिषद आमदार दादाराव केचे यांनी अंतर्गत राजकारणाला कंटाळून संताप व्यक्त केल्याने चव्हाट्यावर आली आहे.
आमदार केचे यांनी भाजपातील अंतर्गत कुरघोडीचा पाढा विदर्भ भाजपचे संघटन मंत्री उपेंद्र कोठेकर यांच्या समोर मांडला. यावरून आर्वी विधानसभा मतदारसंघात भाजपात अंतर्गत संघर्ष टोकाला पोहचल्याचे चित्र आहे. केचे यांच्या दहीहंडी कार्यक्रमाला आर्वी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्याने भाजपातील नेत्याच्या सांगण्यावरून फायर ब्रिगेड गाडी दिली नसल्याची खंत आमदार दादाराव केचे यांनी व्यक्त केली. कुरघोडी होत असल्याने संतापलेल्या आमदार केचे यांचा राग अनावर झाला आणि हाच राग आपल्या भाषनातून व्यक्त केला गेला.
उदघाटन प्रसंगी आमदार दादाराव केचे यांनी आर्वीमध्ये भाजपात अंतर्गत राजकीय भेदभाव असल्याची तक्रार विदर्भ संघटक उपेंद्र कोठेकर यांच्यापुढे केली. केचे यांनी व्यक्त केलेल्या संतापाची जिल्ह्यात खासी चर्चा रंगली आहे.

## पालकमंत्र्यांच्या अधिकारांवर मर्यादा

डीपीडीसीच्या निधी वाटपातील मनमानीला बसणार चाप

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :
महायुती सरकारमध्ये जिल्ह्यांच्या पालकमंत्री निवडीवरून सुरू असलेला वाद अजूनही कायम असताना, सरकारने पालकमंत्र्यांच्या अधिकारांवर मोठा निर्णय घेतला आहे.
आतापर्यंत जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीडीसी) निधी वाटपावर पालकमंत्र्यांची संपूर्ण पकड होती. मात्र, पालकमंत्र्यांच्या या मनमानीवर आता सरकारने लगाम घालण्याचा निर्णय घेतला असून, निधी वाटपाच्या नवीन धोरणास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. आतापर्यंत डीपीडीसी निधी वाटप पूर्णपणे पालकमंत्र्यांच्या हातात होते. कोणत्या आमदाराला किती निधी द्यायचा आणि कोणत्या कामांना प्राधान्य द्यायचे, हे तेच ठरवत होते. यामुळे सत्ताधारी पक्षाच्या आमदारांना जास्त निधी मिळतो, तर विरोधी पक्षांच्या आमदारांच्या कामांकडे दुर्लक्ष होते, अशा अनेक तक्रारी सातत्याने येत होत्या. या मनमानी कारभारावर नियंत्रण आणण्यासाठी सरकारने हे पाऊल उचलले आहे.
नवीन धोरणानुसार, जिल्हाधिकाऱ्यांना पालकमंत्र्यांच्या मंजुरीने जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून पाच टक्क्यांपर्यंतची रक्कम तातडीच्या किंवा आपत्कालीन खर्चासाठी वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे. यामुळे निधीचा राजकीय गैरवापर थांबेल, असा दावा सत्ताधाऱ्यांनी केला आहे. यामुळे कोणत्याही एका पक्षाच्या आमदाराला झुकते माप देणे शक्य होणार नाही, असे म्हटले जात आहे.

## दिल्ली सीएम रेखा गुप्ता यांच्यावर हल्ला

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २० :
मुख्यमंत्री निवासस्थानी झालेल्या जनसुनावणीदरम्यान दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यावर बुधवारी सकाळी हल्ला झाला.



मीडिया रिपोर्ट्नुसार, त्यांना थप्पड मारण्यात आली.
आरोपीने मुख्यमंत्र्यांचा हात धरला आणि त्यांना ओढले. त्या टेबलाच्या कोपऱ्यावर आदळल्या. त्यांच्या डोक्याला दुखापत झाली आहे. थप्पड मारण्याची घटना चुकीची आहे. आरोपीने स्वतःची ओळख राजेश भाई खिमजी (४१) अशी करून दिली आहे. तो गुजरातमधील राजकोटचा रहिवासी आहे. त्याला पोलिसांनी अटक केली असून, तपास सुरू आहे, मुख्यमंत्र्यांवर उपचार सुरू आहेत.




# पोलीस दलात १५,६३१ पदांची मेगा भरती जाहीर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :
महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाने १२ ऑगस्टच्या बैठकीत १५,६३१ पदांची पोलिस भरती करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयानुसार गृह विभागाने पोलिस शिपाई आणि कारागृह शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी भरती प्रक्रिया राबवण्यास मंजुरी दिली असून, यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णयही जारी करण्यात आला आहे.
महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलिस शिपाई तसच कारागृह विभागातील कारागृह शिपाई संवर्गातील १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत रिक्त झालेली आणि १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत रिक्त होणारी १५६३१ पदे भरतीकरीता उपलब्ध होणार आहेत.
त्यामध्ये पोलिस शिपाई : १२३९९, पोलिस शिपाई चालक : २३४, बॅण्डस्मन : २५, सशस्त्र पोलिस शिपाई : २३९३, कारागृह शिपाई : ५८० अशी एकूण १५६३१ पदे भरली जाणार आहेत.
शासन निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या ४ मे २०२२ आणि २१ नोव्हेंबर २०२२ च्या शासन निर्णयातील तरतूदींमधून शिथिलता देऊन पोलिस शिपाई भरती सन २०२४ -२५ ची भरती प्रक्रिया घटकस्तरावरुन राबवण्यास तसेच ओएमआर आधारीत



अधिकृत शासन निर्णय जारी

लेखी परीक्षा घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. सन २०२२ व सन २०२३ मध्ये संबंधित पदाची विहित कमाल वयोमयार्दा ओलांडलेल्या उमेदवारांना एक वेळची विशेष बाब म्हणून प्रस्तुत भरती प्रक्रियेकरीता आवेदन अर्ज सादर करण्यास पात्र ठरविण्यात आले आहे.
या भरती प्रकियेसाठीही या पूर्वीच्या पोलिस शिपाई भरतीप्रमाणेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.४५०/- व मागास प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.३५०/- इतके परीक्षा शुल्क आकारण्यास तसेच परीक्षा शुल्क स्वरुपात जमा झालेली रक्कम भरती प्रक्रियेकरीता खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## प्रशासनाच्या तत्परतेने विद्यार्थी परिक्षेसाठी दिल्लीला रवाना

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. २० :
भामरागड तालुक्यातील पर्लकोटा नदीच्या पुरामुळे मागील चार दिवसांपासून अडकून पडलेल्या चार विद्यार्थ्यांना अखेर प्रशासन व आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या प्रयत्नांमुळे सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले. हे विद्यार्थी दिल्ली येथे २३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या केंद्र सरकारच्या डीएसएसएसबी विभागाच्या परीक्षेसाठी जाणार होते.
पुराच्या पाण्यामुळे भामरागड शहरात अडकलेल्या विद्यार्थ्यांना बुधवार २० ऑगस्ट रोजी विशेष मोहिम राबवून टीमच्या मदतीने बोटीद्वारे पर्लकोटा नदी पार करून हेमलकसा येथे पोहोचविण्यात आले. यानंतर त्यांना पुढे दिल्लीच्या प्रवासासाठी रवाना करण्यात आले. जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे महत्त्व लक्षात घेऊन तहसील प्रशासनाला सर्वतोपरी मदत करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार महसूल प्रशासन, नगरपंचायत भामरागड तसेच एचडीएफ टीमने समन्वय साधून ही मोहिम यशस्वी केली.

# लाकडी फाडी डोक्यावर मारून सासऱ्याचा खून

**सासूलाही केले गंभीर जखमी**

**मालखेड येथील घटना**

**फरार मारेकरी जावयाचा शोध सुरू**

*महासागर प्रतिनिधी*

*चांदूर रेल्वे,दि.20 )-जावयाने सासऱ्याचा खून तर सासूला गंभीर जखमी केल्याची दुर्दैवी घटना चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन हद्दीतील मालखेड येथे 15 ऑगस्ट ला घडली. याप्रकरणी आरोपीविरूध्द 19 ऑगस्ट रोजी सायंकाळी 6.32 वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दामोदर श्रावणजी अळणे ( 70 ) असे मृतक सार्सयाचे नाव असुन देविदास अंबादास ठाकरे ( वय 30 वर्ष, रा. मालखेड रेल्वे ) असे फरार आरोपी जावायाचे नाव आहे.*




पोलीस सुत्रांच्या माहितीनुसार, फिर्यादी व आरोपी हे पती - पत्नी आहे. फिर्यादी ही 4 जुनपासून तीचे माहेरी मालखेड येथे राहायला आली होती. 15 ऑगस्ट रोजी आरोपी हा फिर्यादीला भेटायला तीचे माहेरी आला व फिर्यादीच्या आई - वडीलांना म्हटले की फिर्यादीला सासरी घेवून जायचे आहे. मात्र फिर्यादीचे आई - वडीलांनी विरोध केला असता त्यांच्यामध्ये वादावादी झाली. तेव्हा फिर्यादीचे वडील दामोदर अळणे यांनी घरातून सेन्ट्रीग कामाची लाकडी फाडी आणली, तेव्हा आरोपीने ती फाडी अळणे यांचे हातातून हिसकावून त्यांचाच डोक्यात मारली. तेव्हा फिर्यादीची आई प्रभा अळणे ही सोडवायला मधात गेली असता तिला सूध्दा आरोपीने डोक्यावर लाकडी फाडी मारल्याने गंभीर जखमी झाली. त्यानंतर फिर्यादीने तिचे वडील गंभीर जखमी दामोदर अळणे यांना जिल्हा सामान्य रूग्णालय, अमरावती येथे भरती केले व पुढील उपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपूर येथे भरती केले. याठिकाणी त्यांच्या डोक्याचे ऑपरेशन सुध्दा झाले. मात्र 18 ऑगस्ट रोजी उपचारादरम्यान ते मरण पावले. फिर्यादी यांच्या तक्रारीवरून आरोपी देविदास अंबादास ठाकरे याच्याविरूध्द बीएनएस कलम 103 (1), 109 (1) अन्वये गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहे. आरोपीच्या शोधात पोलीस पथक वेगवेगळ्या ठिकाणी रवाना झाले होते.

# मृतक प्रविणच्या कुटुंबास अनु.जमाती कल्याण समितीची भेट

**पीडितांना आर्थिक मदत व नरभक्षक वाघाच्या बंदोबस्ताचे निर्देश**



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.20 )** - चिखलदरा तालुक्यातील कुलंगणा येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेत प्रवीण सुक्रम बेलसरे (17) यांचा मंगळवारी वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. या हृदयद्रावक प्रसंगानंतर अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या वतीने मृतकाच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन करण्यात आले.

यावेळी प्रवीण बेलसरे यांच्या कुटुंबास तातडीची मदत म्हणून 5 लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. तसेच परिसरात दहशत माजवणाऱ्या नरभक्षक वाघाच्या बंदोबस्तासाठी तातडीने पावले उचलण्याचे स्पष्ट निर्देश वनविभाग व प्रशासनाला देण्यात आले.

## महादेव दर्शनासाठी गेलेल्या बालकाचा मृत्यू

दरम्यान, मंगळवारीच आणखी एक दुर्दैवी घटना घडली. महादेवाच्या दर्शनासाठी गेलेल्या आनंद रामकिसन मावस्कर (वय 8) हा नदीच्या प्रवाहात वाहून गेला आणि त्यात त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर आमदार केवलराम काळे यांनी वैयक्तिकरित्या कुटुंबीयांना आर्थिक मदत केली.या दौऱ्यात समितीचे प्रमुख दौलत दरोडा, आमदार केवलराम काळे, शांताराम मोरे, मंजुळा गावित, रामदास मसराम, राजेश राठोड, विनोद निकोले, हिरामण खोरस्कार, राजू तोडसाम, उमा खापरे यांच्यासह जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जि.प. कार्यकारी अधिकारी संचिता महापात्रा, प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, तहसीलदार जीवन मोरणकर, सहाय्यक उपवनसंरक्षक वैभव घारगे, वन परिक्षेत्र अधिकारी, सरपंच व ग्रामस्थ उपस्थित होते. समितीने शासनाच्या विविध योजनांतर्गत पीडित कुटुंबांना न्याय मिळावा व त्यांना आवश्यक ती मदत मिळवून द्यावी यासाठी प्रशासनाकडे ठोस पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

# पुरवठा विभागात 23.57 लाखांची अफरातफरी

**तांत्रिक कर्मचाऱ्याने वरिष्ठांना न सांगता निधी खात्यात वळवला**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )**- जिल्हा पुरवठा विभाग कार्यालयात शासकीय नियुक्त कंपनीमार्फत काम करणाऱ्या एका तांत्रिक कर्मचाऱ्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी न घेता शासकीय निधी थेट आपल्या व इतरांच्या खात्यात वळवून तब्बल 23 लाख 57 हजार 500 रुपयांची अफरातफरी केल्याचा प्रकार समोर आला आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद अशोकराव लांडे (42, रा. कठोरा नाका) यांनी या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांत तक्रार दिली आहे की, आरोपी अभिजीत राजेंद्र भुस्कडे (रा. दुर्गा विहार, अमरावती) हा तांत्रिक कर्मचाऱ्याच्या नात्याने शेतकरी सुविधेच्या लाभार्थ्यांची माहिती व वितरण पाहत होता. मात्र, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वितरणाची लिस्ट मागितल्यावर तो टाळाटाळ करू लागला. त्यामुळे संशय आल्याने तपास सुरू झाला.

नवीन नियुक्त प्रसाद सराटे यांनी डेटा तपासला असता, अभिजीत भुस्कडे याने शेतकरी लाभार्थी नसतानाही हेमंत सूर्यवंशी (30) व इतर दोन महिलांच्या खात्यात रक्कम जमा केली असल्याचे उघड झाले. याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी लांडे यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अभिजीत भुस्कडे, हेमंत सूर्यवंशी व दोन महिलांविरुद्ध फौजदारी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# मोर्शीत नाल्यात आढळला 65 वर्षीय इसमाचा मृतदेह

**मुसळधार पावसामुळे नाल्यात वाहून गेल्याची शक्यता**



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि.20 )** - मोर्शी तालुक्यातील शिरलस येथे एका नाल्यात 65 वर्षीय इसमाचा मृतदेह आढळून आला. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून मृत्यू नाल्याच्या पुरात वाहून गेल्याने झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

मृताचे नाव भीमराव गुलाबराव वाकोडे (वय 65, रा. वडूरा, ता. चांदुरबाजार, ह.मु. शिरलस) असे आहे. वाकोडे हे राजुरवाडी येथील एका ढाब्यावर रखवालदार म्हणून काम करत होते. ते 18 ऑगस्ट रोजी शिरलस येथील आपल्या साळीकडे गेले होते. दुपारचे जेवण करून ते चांदुरबाजार येथे निघाले होते. मात्र, सततच्या मुसळधार पावसामुळे ते गावाला पोहोचू शकले नाहीत.

नेहमीप्रमाणे वाकोडे हे राजुरवाडी ते शिरलस पायी प्रवास करीत. दरम्यान, संततधार पावसामुळे राजुरवाडी-तिवसा रोडवरील शिरलस फाट्याजवळील नाल्यात मोठा पुर आला. त्यावेळी त्यांचा पाय घसरून ते पाण्यात वाहून गेले असावेत. 19 ऑगस्ट रोजी दुपारी साडेचार वाजता शेताजवळील झाडाझुडपात त्यांचा मृतदेह अडकलेला आढळला.

घटनेची माहिती मिळताच पोलिस पाटलांनी शिरखेड पोलिसांना कळविले. ठाणेदार सचिन लुले यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह. मनोज कळसकर यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह बाहेर काढून उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी येथे शवविच्छेदनासाठी रवाना करण्यात आला.

या घटनेने स्थानिकांमध्ये हळहळ व्यक्त होत असून मुसळधार पावसामुळे सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पुढील तपास शिरखेड पोलिस करीत आहेत.

# प्रिती बंड शिवसेनेच्या उपनेतेपदी

**कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )**- महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार प्रिती संजय बंड यांची शिवसेना पक्षाच्या उपनेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रिती बंड या शिवसेनेचे दिवंगत नेते व माजी आमदार संजय बंड यांच्या पत्नी आहेत. त्यांनी नुकताच शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश केला असून, याआधी त्या उद्धव ठाकरे गटाच्या शिवसेनेत संघटक म्हणून कार्यरत होत्या. त्यांनी बडनेरा विधानसभा मतदार संघातून दोनवेळा निवडणूक लढवली असून, प्रस्थापित आमदार रवी राणा यांना त्यांनी निकराची लढत दिली. एकदा त्या शिवसेनेच्या उमेदवार म्हणून तर दुसऱ्यांदा अपक्ष उमेदवार म्हणून मैदानात उतरल्या होत्या. त्यामुळे स्थानिक राजकारणात त्यांचे वजनदार नाव म्हणून ओळखले जाते. आता झालेली ही उपनेतेपदी नियुक्ती त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील एक मोठं यश मानले जात आहे.

शिवसेना नेतृत्वाने त्यांच्याकडून पक्ष संघटना बळकट करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. ही नियुक्ती एक वर्ष कालावधीसाठी असेल. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार व धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण यांचा प्रचार-प्रसार करून, पक्ष वाढीसाठी सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन कार्य करणार असल्याचा विश्वास प्रिती बंड यांनी व्यक्त केला आहे.

उपनेते पद हे पक्षातील दुसरे महत्त्वाचे नेतृत्व मानले जाते. या पदावरून संघटन, जनसंपर्क आणि निवडणुकीची तयारी यामध्ये सक्रिय भूमिका घ्यावी लागते. तसेच पक्षाचे धोरण राबवणे, कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणे आणि स्थानिक प्रश्न पक्षनेतृत्वापर्यंत पोहोचवणे ही उपनेत्याची जबाबदारी असते. थोडक्यात सांगायचं तर, उपनेते हे पक्षप्रमुखांचे विश्वासू सहकारी आणि पक्ष संघटनेतील आधारस्तंभ मानले जातात. या नियुक्तीमुळे अमरावती जिल्ह्यातील नेत्यांमध्ये प्रचंड उत्साह संचारला आहे.

## विभागीय आयुक्तालयात ‘सद्‌भावना दिवस’प्रतिज्ञा

**अमरावती** - दिवंगत प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या 81 व्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी विभागीय आयुक्त कार्यालयात अधिकारी-कर्मचाऱ्यांना ‘सद्भावना दिवस’ प्रतिज्ञा दिली. जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता सर्व भारतीय जनतेचे भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करण्याची, तसेच सर्व प्रकारचे मतभेद हिंसाचाराचा अवलंब न करता संविधानिक मार्गांनी सोडवण्याची प्रतिज्ञा यावेळी उपस्थितांनी घेतली. दिवंगत प्रधानमंत्री राजीव गांधी यांची जयंती सद्भावना दिवस म्हणून साजरी करण्यात येते.

# आधारकार्ड, क्रेडिट कार्डचे फोटो काढून 1.37 कोटींची ऑनलाईन फसवणूक

**कम्प्युटर, मोबाईल दुरुस्तीच्या बहाण्याने ठगविले**




**अमरावती, ( दि.20 )** - शहरातील गाडगेनगर भागात कम्प्युटर व मोबाईल दुरुस्तीच्या बहाण्याने एकाने तब्बल 1 कोटी 37 लाख 93 हजार 500 रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी अंजनगावबारी येथील आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

जिल्हा परिषदेच्या समोर योगिनी कॉम्प्लेक्स येथे राहणारे विजय वसंत सोनपरोते (46) यांच्या घरातील कम्प्युटरमध्ये बिघाड झाल्याने त्यांनी 21 एप्रिल 2025 रोजी आरोपी संकेत विजय मनोहर (25, रा. अंजनगावबारी) याला दुरुस्तीकरिता बोलावले. त्याने कम्प्युटर दुरुस्त केल्यानंतर मोबाईलमध्ये व्हायरस असल्याचे सांगत तोही हाताळला. यावेळी त्याने सोनपरोते यांच्याकडून आधारकार्ड व क्रेडिट कार्ड मागून त्यांचे फोटो काढले. यानंतर काही दिवसांनी सोनपरोते यांनी क्रेडिट कार्डचे स्टेटमेंट तपासले असता त्यांना धक्काच बसला. त्यांच्या खात्यातून 1.37 कोटींची रक्कम काढून फसवणूक करण्यात आल्याचे दिसून आले. याबाबत त्यांनी गाडगेनगर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. सोनपरोते यांनी संकेतला फोन करून पैसे परत करण्याबाबत विचारणा केली असता तो टाळाटाळ करू लागला. तुम्ही पोलिसांत तक्रार करू नका, मी पैसे परत करतो असा मेसेजही त्याने केला. मात्र त्यानंतर त्याने संपर्क तोडला. अखेर सोनपरोते यांनी थेट पोलिस ठाण्यात धाव घेतली. त्यानंतर पोलिसांनी आरोपीविरुद्ध आयटी ॲक्टसह फसवणुकीचे गुन्हे नोंदवले असून, तो अद्याप फरार आहे.

# लाखो लीटर पाण्याचा अपव्यय

**अमरावती** - प्रशांत नगर ते मोतीनगर मुख्य रस्त्यावर गेल्या तीन दिवसांपासून पाईपलाईन फुटल्यामुळे लाखो लिटर पाणी वाया जात आहे. रस्त्यावर मोठा खड्डा पडल्याने वाहनचालकांना धोका निर्माण झाला आहे. खड्डयात पाणी साचल्याने अपघातांची शक्यता वाढली आहे. नागरिकांनी अनेक वेळा पाणीपुरवठा विभागाकडे तक्रार केली तरी अद्याप दुरुस्ती करण्यात आलेली नाही. शहरात पाणीटंचाईचे संकट असताना इतक्या मोठ्या प्रमाणात पाणी वाया जाणे हे गंभीर असून प्रशासनाने तातडीने दखल घेऊन पाईपलाईन दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.



# जारिदा विद्युत उपकेंद्राचा 11 केव्ही पुरवठा खंडित

**चुरणी परिसरातील गावे दोन दिवसांपासून अंधारात**



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.20 )**- जारिदा विद्युत उपकेंद्राचा 11 केव्हीचा पुरवठा गेल्या दोन दिवसांपासून खंडित झाला आहे. तांत्रिक बिघाड झाल्याने या भागातील वीजपुरवठा ठप्प झाला असून चुरणी परिसरातील नागरिक प्रचंड अडचणीत आले आहेत.

पावसाळ्यात वीजपुरवठा खंडित होणे नवीन नाही, मात्र यावेळी विद्युत वितरण विभागाच्या हलगर्जीपणामुळे परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. गावोगावी रात्री अंधाराचे साम्राज्य असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम झाला आहे. विद्यार्थ्यांचे अभ्यासाचे नुकसान होत आहे. पाणी पंप बंद असल्याने पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. शेतकऱ्यांना अडचणी येत असून दुग्धव्यवसाय करणाऱ्यांचे दूध साठवण्यासाठी लागणाऱ्या सुविधा कोलमडल्या आहेत.

पावसामुळे आधीच रस्ते, नाले, घरे व शेतीत अनेक अडचणी निर्माण झालेल्या आहेत. त्यातच वीज नसल्याने ग्रामस्थांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. मोबाईल टॉवर्स बंद पडल्याने संपर्क साधने ठप्प झाली आहेत. आपत्कालीन परिस्थितीत माहिती नागरिकांपर्यंत पोहोचत नाही.

**विद्युत विभागाकडून निष्काळजीपणा**

ग्रामस्थांच्या मते दोन दिवसांपासून वारंवार तक्रारी करूनही अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही. कोणतेही दुरुस्ती पथक वेळेत पोहोचले नाही. गावांमध्ये तारा सैल झाल्या आहेत. काही ठिकाणी फ्यूज व डिओ जळाले आहेत. तरीही विभागाची हालचाल होत नाही. त्यामुळे ग्रामस्थांचा रोष वाढत आहे.

**ग्रामस्थांचा संताप**

आम्ही दोन दिवसांपासून अंधारात आहोत. लहान मुले, वृद्ध व आजारी रुग्णांना त्रास सहन करावा लागत आहे. तातडीने कार्यवाही न झाल्यास आम्ही आंदोलन करू, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

या प्रकरणामुळे पुन्हा प्रश्न निर्माण झाला आहे की पावसाळ्यात ग्रामीण भागातील वीजपुरवठा नेहमीच का विस्कळीत होतो आणि त्यावर कायमस्वरूपी तोडगा निघणार कधी ? विद्युत विभागाच्या हलगर्जीपणामुळे मेळघाटातील आरोग्य सेवा, बँकिंग सेवा व मोबाईल सेवा प्रभावित झाली आहे. पोळा सण जवळ आल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. विभागाच्या निष्काळजीपणाचा फटका आदिवासींना बसत आहे.

**नरेंद्र टाले, प्रहार कार्यकर्ता .**

# पोलीसांचा ड्रग्ज विक्रेत्यांवर अंकुश

**दोन आरोपी जेरबंद, 88 हजारांचा मुद्देमाल जप्त**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )** - शहरात अमली पदार्थांचा (एम.डी.) धंदा करणाऱ्यांना नागपुरी गेट पोलिसांनी मोठा चपराक दिला आहे. धडक कारवाईत दोन इसमांना अटक करून तब्बल 88 हजार 200 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गुरुवारी रात्री पो.उपनिरीक्षक पंकज गुप्ता हे पथकासह गस्त घालत असताना गुप्त माहिती मिळाली की, लालखडी रोडवरील पुलाजवळ एक तरुण एम.डी. विक्रीसाठी थांबला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक उरलागोंडावर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सापळा रचून मतिन अहमद अब्दुल मुनाफ (27, रा. पठाण चौक, अमरावती) याला पकडले. त्याच्या ताब्यातून 14.50 ग्रॅम एम.डी. (किंमत 72,500 रु.), मोबाईल व रोख मिळून 88,200 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मोबाईल फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळीच पदार्थाची पुष्टी केली.

चौकशीत मतिनने कबुली दिली की, अमली पदार्थ शेख नौशाद शेख सलीम (36, रा. बिसमिल्ला नगर, लालखडी) याच्याकडून घेतले होते. यानंतर पोलिसांनी केवळ दोन तासांत नौशादलाही जेरबंद केले. या प्रकरणी कलम 8(क), 21(ब), 29 एन.डी.पी.एस. कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपआयुक्त गणेश शिंदे, सहा. पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. मोहिमेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक उरलागोंडावर, दुय्यम पो.नि. निशांत देशमुख, पो.उपनिरीक्षक पंकज गुप्ता व त्यांच्या पथकाचा सहभाग होता. नागपुरी गेट पोलिसांच्या या कारवाईमुळे अमरावतीतील अमली पदार्थ विक्रेत्यांमध्ये चांगलाच खळबळ उडाला आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# अचलपूरात दिवसा घरफोडी करणारे दोन आरोपी मध्यप्रदेशातून अटक

## 2.5 लाखांचे दागिने लंपास; स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 )** - अचलपूर शहरातील मणिरत्न कॉलनीत झालेल्या दिवसा घरफोडी प्रकरणातील दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने मध्यप्रदेशातील बैतुल येथे अटक केली आहे. या कारवाईत आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली मोपेड जप्त करण्यात आली असून चोरीचे दागिने विक्रीस दिल्याची कबुलीही त्यांनी दिली आहे. प्रविण रामराव धोटे (57, रा. मणिरत्न कॉलनी, अचलपूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, 7 ऑगस्ट रोजी दुपारी त्यांच्या पत्नी सीमा धोटे या मुलीला शाळेतून आणण्यासाठी घराला कुलूप लावून गेल्या असताना अज्ञात इसमांनी घरफोडी केली. घरातील कपाट तोडून मंगळसूत्र, बांगड्या आणि इतर दागिने मिळून सुमारे 55 ग्रॅम सोने, किंमत अंदाजे 2.5 लाख रुपये असा मुद्देमाल चोरून नेण्यात आला होता. या प्रकरणी अचलपूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता. तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक तपास, तसेच गुप्त माहितीच्या आधारे आरोपी नितीन दिलीप विश्वकर्मा (36) आणि सुरज तुलाराम भावसार (22, दोघेही रा. बैतुल, मध्यप्रदेश) यांचा शोध लावला. 19 ऑगस्ट रोजी



अमरावती ग्रामीण गुन्हे शाखेचे पथक बैतुल येथे पोहोचले असता आरोपी मिळून आले. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिल्यानंतर अखेर दोघांनी मिळून गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांनी चोरी केलेले दागिने बैतुल येथील ज्वेलर्स दुकानात विकल्याचेही सांगितले. या कारवाईत आरोपींकडून सुजुकी बर्गमन कंपनीची विनानंबर मोपेड (किंमत सुमारे 80,000 रुपये) जप्त करण्यात आली आहे. पुढील तपासादरम्यान विक्रीस गेलेले सोन्याचे दागिने जप्त करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आरोपींना अटक करून अचलपूर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक सचिन पवार, पोलिस कर्मचारी युवराज मानमोठे, रविंद्र वर्हाडे, स्वप्नील तंवर, सागर नाठे, शांताराम सोनोने, सायबर विभागाचे सागर धापड आणि चालक हर्षद घुसे यांनी केली.

# परतवाड्यात काँग्रेसचा निवडणूक आयोगाविरोधात कॅन्डल मोर्चा




**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर,( दि.20 )** - काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते खा. राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत मतदार यादीतील मोठ्या प्रमाणातील घोटाळे उघडकीस आणले आहेत. या प्रकरणाच्या निषेधार्थ आंदोलनात्मक कार्यक्रम हाती घेण्याचे निर्देश जिल्हा काँग्रेस कमिटी ग्रामीणचे अध्यक्ष बबलू देशमुख यांनी दिले होते.

या पार्श्वभूमीवर वोट चोर खुर्ची छोड या घोषणा देत परतवाडा येथे जयस्तंभ चौकातून काँग्रेसतर्फे कॅन्डल मार्च व मशाल मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चात अचलपूर तालुका अध्यक्ष नामदेवराव तनपुरे, अचलपूर शहर अध्यक्ष श्रीकांत झोडपे, माजी जि.प. सदस्य वासंती मंगरोळे, परतवाडा शहर अध्यक्ष सागर व्यास, बाजार समिती उपसभापती अमोल चिमोटे, सईद मौलाना, अजीज खान, अनु.जाती विभाग अध्यक्ष राहुल गाठे, सेवादल अध्यक्ष सचिदानंद बेलसरे, ओबीसी विभाग अध्यक्ष दिनेश वानखडे, एतेशाम सहदेव बेलकर, किशोर झारखंडे, विशाल खानझोडे, राहुल अपाले, राजीक, हिम्मतराव अभ्यंकर, प्रविण हुळ, अबीद जाकीर, अकबर सर, सफदर, जय घोरे, रामेश्वर वानखडे, धिरज वासनकर, इंगळे साहेब, गोलू, येमुन, अन्सार, योगेश डांगे, कैलास कडू, युनूस, अफसर, रहिम, बाबाखान, जुबेरखान, बाळासाहेब सिरसुंदे, अरबाजखान यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले. या आंदोलनाद्वारे निवडणूक आयोगाने मतदार यादीतील घोटाळ्यांवर तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा व्यापक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी दिला.

# जिल्हास्तरीय अंतराळ दिवस साजरा

## शेकडो विद्यार्थ्यांचा सहभाग

**महासागर प्रतिनिधी**
**भातकुली,( दि.20 )**- पुरोगामी विद्यालय आसरा येथे नेहमीच विज्ञानविषयक उपक्रम राबविले जातात. यंदा विज्ञान भारती विदर्भ प्रदेश आणि नरसम्मा कॉलेज अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने 19 ऑगस्ट 2025 रोजी जिल्हास्तरीय अंतराळ दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात मॉडेल मेकिंग, पोस्टर बनविणे, रांगोळी स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण भागातील शेकडो विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला व आपल्या सर्जनशीलतेचे उत्कृष्ट सादरीकरण केले.

पुरोगामी विद्यालय आसरा येथील नमन राहुल मोहोड, आनंदी प्रविण सोळंके व श्रुतिका राम गाळे या विद्यार्थ्यांनी 'स्पेस स्टेशन बांधकाम' या विषयावर उत्कृष्ट मॉडेल, पोस्टर आणि रांगोळी सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या या कामगिरीचे



उपस्थितांनी विशेष कौतुक केले. या विद्यार्थ्यांना विद्यालयातील विज्ञान शिक्षक जि.आर.वडतकर व ए. एस. बोबडे यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रोत्साहनामुळे विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य खुलविले. अंतराळ दिवसाच्या निमित्ताने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या नव्या संकल्पनांचा अनुभव घेण्याची संधी मिळाली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो व विज्ञानाविषयीची आवड अधिक दृढ होते, असे मत आयोजकांनी व्यक्त केले. शाळेतील मुख्याध्यापिका विल्हेकर, शिक्षक राठोड, गांजरे, उईके तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# काटेरी झुडपे देत आहेत अपघाताला निमंत्रण



**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड,( दि.20 )**- हिवरखेड ते मोर्शी हा मोठा रोड आहे.टुव्हिलर करीता स्पेशल पांढरा पट्टा मारण्यात आला. मात्र टुव्हिलर लाल.यांना काटेरी झुडपांमुळे रोडच्या मधातून गाडी चालवावी लागते. तर मधात सिमेंट रोडला मोठमोठ्या भेगा पडल्या आहेत.त्यात गाडी स्लिप होवून अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच टु व्हिलर च्या रोडने गाडी चालतांना केव्हा काटेरी झुडपे मधात येणार हे सांगता येत नाही.परीनामी गाडी मेन रोड वर घ्यावी लागते त्या पाठीमागून मोठे वाहने भरधाव वेगाने येतात.त्यामुळे ऐखादा मोठा अपघात होण्याचे नाकारता येत नाही.ज्या इंफ्राकंपनीने रस्त्याच्या मेन्टेनन्सकरीता कंत्राट घेतला आहे. त्या कंपनीने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी परीसरातील नागरीक करीत आहे.

# बुद्धिबळ, योगा क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.20 )** - क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती तसेच चांदूर रेल्वे तालुका क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील जिंगल बेल इंग्लिश स्कूल येथे नुकतेच बुद्धिबळ व योगासन ह्या क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक अतुल उज्जैनकर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारीरिक शिक्षक एस.टी. तायडे यांनी केले. कार्यक्रमाला दोन्ही क्रीडा प्रकारात तालुक्यातील अनेक शाळांतील सहभागी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर क्रीडा संयोजक राजन पुंड, क्रीडा मार्गदर्शक नंदू सोरगीवकर, क्रीडा शिक्षक देशमुख, सावळीकर, ठाकरे, संदीप मस्करे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन नंदू सोरगीवकर तर आभार प्रदर्शन संदीप मस्करे यांनी केले.

# वडीलानंतर तीन दिवसात मुलाचा मृत्यू

## दुहेरी आघाताने भुरे परिवार उध्वस्त

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि.20 )** - दुःखावर दुःखाचा डोंगर कोसळल्याची हृदयद्रावक घटना अंजनगाव बारीत घडली आहे. तीन दिवसांपूर्वी वडिलांचे निधन झाल्यानंतर केवळ तिसऱ्याच दिवशी मुलाचाही हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याने भुरे कुटुंबावर काळाने क्रूर घाला घातला.



दि. 20 ऑगस्ट रोजी सकाळी सुमारास गजानन अरुणभाऊ भुरे (40) यांना अचानक चक्कर येऊन तीव्र झटका आला. तत्काळ वैद्यकीय उपचारासाठी प्रयत्न करण्यात आले, मात्र त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. याआधी 18 ऑगस्ट रोजी गजानन यांचे वडील अरुणभाऊ महादेवराव भुरे (70) यांचे निधन झाले होते. वडिलांच्या अस्थी विसर्जनाचा विधी पूर्ण झाल्यानंतर अवघ्या तिसऱ्याच दिवशी गजानन यांच्या निधनाने कुटुंबातील एकमेव आधारवड गमावल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या दुहेरी आघाताने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून गावकऱ्यांनी हळहळ व्यक्त केली आहे. अचानक झालेल्या या दुर्दैवी घटनेमुळे भुरे परिवारावर दुःखाचे सावट गडद झाले आहे.

# पत्रकाराचे महामंडळ स्थापनेसाठी अ.भा.ग्रा. पत्रकार संघ लढा देणार!

## अ.भा.ग्रा. पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोहर सुने यांची माहिती

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.20 )**- ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ सदैव तत्पर राहिला आहे. पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी विमा कवचाची सुविधा सर्व सभासदांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय लवकरच 'साप्ताहिक संपादक' मंच स्थापण करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने यांनी दिली.

महाराष्ट्र सरकारने पत्रकार कल्याणासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करावे, अशी मागणी संघटनेने केली आहे. या मागणीची पूर्तता न झाल्यास मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्याची तयारी असल्याचे सुने यांनी स्पष्ट केले. अ.भा.ग्रा. पत्रकार संघाच्या केंद्रीय व राज्य पदाधिकाऱ्यांच्या वाढदिवसानिमित्त 1 ते 15



ऑगस्टदरम्यान राज्यभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या पंधरवडा उपक्रमाचा समारोप 17 ऑगस्ट रोजी चांदूर रेल्वे येथील संताबाई यादव मंगल कार्यालयात पार पडला झाला.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मनोहर सुने होते. प्रमुख अतिथींमध्ये उद्योजक हाजी अब्दुल हमीद, कैलास गिरोळकर, दीपक गोरडे, केंद्रीय कार्याध्यक्ष युसुफ खान, सरचिटणीस अशोक पवार, उपाध्यक्ष राजेंद्र भुरे, संपर्कप्रमुख अरुण कुलथे, महाराष्ट्र उपाध्यक्ष सुरेश ढवळे, ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर भगोले, प्राचार्य विश्वास दामले, केंद्रीय सदस्य बाळासाहेब सोरगिवकर, कार्यालय प्रमुख बाबाराव खडसे, प्रसिद्धी प्रमुख सागर सवळे, संपादक राहुल कविटकर, सचिव सचिन ढोके, जिल्हा संपर्कप्रमुख ओमप्रकाश कुऱ्हाडे, प्रदेश उपाध्यक्ष संजय पोफळे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. प्रास्ताविक बाळासाहेब सोरगिवकर यांनी केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर भगोले आणि प्राचार्य विश्वास दामले यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर केंद्रीय कार्याध्यक्ष युसुफ खान यांचा वाढदिवस असल्याने उपस्थित सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन केंद्रीय चिटणीस प्रा. रवींद्र मेंढे यांनी केले.



# रक्षाबंधनानिमित्त वृक्षांना राख्या

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.20 )** - करजगाव (गांधीघर) येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेत रक्षाबंधन सण अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूपासून आकर्षक राख्या तयार करून त्या शाळा परिसरातील वृक्षांना बांधल्या.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन, वृक्षांचे महत्त्व, राष्ट्रभक्ती व समानतेचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी सांगितले की, वृक्ष आमचे खरे मित्र आहेत. ते आम्हाला सावली, फळे व प्राणवायू देतात, म्हणूनच आम्ही त्यांना आमचे भाऊ मानून राख्या बांधल्या. मुख्याध्यापक संजय घोरपडे यांनी मार्गदर्शन करताना वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. या उपक्रमात शिक्षक प्रदीप गणोरकर, राजेंद्र बोहरुपी, प्रमोद जावळे, सर्वेश कवडे, अपर्णा गोळे, सुरेखा पोकळे तसेच मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण शिक्षिका नम्रता कडू यांनी विशेष योगदान दिले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाबरोबरच राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ झाली.

# तालुक्यात रोज शेकडो टीप्पर रेती वाहतूक

## कारवाई मात्र दोन-तीनवरच! ■ रेती चोरीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.20 )**- तालुक्यातील अवैध रेती उपसा आणि वाहतूक दिवसेंदिवस वाढत आहे. शासन व प्रशासनाकडून कारवाईचे आदेश असले तरी प्रत्यक्षात होत असलेली कारवाई कितपत परिणामकारक ठरत आहे, याबाबत नागरिकांमध्ये संशय व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दररोज वरुड तालुक्यातून जवळपास शंभर टिप्पर रेतीने भरलेले सुटतात. मात्र कारवाईच्या वेळी केवळ दोन-तीन टिप्पर पकडले जातात. उर्वरित टिप्पर मोकळेपणाने सुटून जातात आणि अवैध रेती वाहतूक सुरूच ठेवतात. त्यामुळे प्रशासनाची कारवाई ही केवळ वरवरची व अल्प परिणामकारक असल्याचे चित्र दिसून येत आहे.



### केवळ दिखावा की खऱ्या अर्थाने कारवाई?

नागरिकांचे म्हणणे आहे की कारवाईचे ढोल मोठ्याने पिटले जात असले तरी प्रत्यक्षात रेतीमाफियांवर फारसा परिणाम झालेला नाही. अल्प मुदतीच्या मोहिमा राबवून केवळ जनतेसमोर दाखवण्यापुरती कारवाई केली जाते, असा आरोपही होत आहे.

### रस्त्यावर रेती टाकून पलायन

अनेकदा तहसीलदार किंवा प्रशासनाची गाडी दिसताच टिप्पर चालकांनी रस्त्यावरच रेती टाकून पलायन केलेल्या घटना घडल्या आहेत. या प्रकारामुळे कारवाईचा धाक काही अंशी दिसत असला तरी रेतीमाफियांवर त्याचा दीर्घकालीन परिणाम होत नाही. उलट काही दिवसांनंतर ही वाहतूक पूर्ववत सुरू राहते.ग्रामीण भागातील नागरिकांच्या मते, रेती चोरीतून दररोज लाखो रुपयांचा गैरव्यवहार होतो. एवढा मोठा व्यवहार काही अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाशिवाय शक्य नाही, अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे. शंभर टिप्पर निघतात आणि फक्त दोन-तीन पकडले जातात, मग उर्वरित कुठे जातात? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

### कायमस्वरूपी उपाययोजनेची गरज

शासनाने जर खरोखरच रेतीमाफियांना आळा घालायचा असेल, तर तात्पुरती कारवाई करून भागणार नाही. सातत्यपूर्ण आणि व्यापक मोहिम राबवून अवैध रेती उपसा कायमस्वरूपी थांबविण्याची गरज आहे. यासाठी प्रशासनाने खंबीरपणे पुढे येणे आवश्यक आहे. रेतीतून 'सोनं' कमावणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी प्रशासन किती ठामपणे काम करते, हे पुढील काही दिवसांत स्पष्ट होईल. नागरिकांच्या अपेक्षा मोठ्या आहेत आणि सर्वांचे लक्ष आता प्रशासनाच्या हालचालींकडे लागले आहे.

# लेझीमच्या तालावर दुमदुमला स्वातंत्र्य दिनाचा उत्सव

## विकास विद्यालय पार्डी येथे उत्साहात आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी,( दि.20 )** - स्वातंत्र्य दिनाच्या उत्सवाने पार्डी (देवी) गाव देशभक्तीच्या रंगात रंगले. न्यू ग्रामीण विकास संस्था संचलित विकास विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढत देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण गाव दुमदुमून टाकले. फेरीदरम्यान लेझीम पथकाच्या तालावर विद्यार्थ्यांनी सादर केलेले नृत्य हे प्रमुख आकर्षण ठरले. चौकाचौकात विद्यार्थ्यांनी केलेली जनजागृती गावकऱ्यांनी कौतुकाने पाहिली.



यानंतर विद्यालयाच्या प्रांगणात झेंडावंदन सोहळा पार पडला. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर करून वातावरण भारावून टाकले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत स्वातंत्र्य संग्रामातील त्यागाची जाणीव करून दिली. या वेळी संस्थेचे अध्यक्ष मधुकरराव पिसे, उपाध्यक्ष अ‍ॅड. सुरेशराव भेंडे, सचिव पांडुरंग बांडाबुचे, सदस्य मधुकरराव ढेंबरे, डॉ. जीवन सवाई यांच्यासह गावातील मान्यवर व माजी विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याध्यापक संतोष परांजपे आणि शिक्षकवर्गाने उपस्थितांचे स्वागत केले.

संदीप टापरे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले तर आभार संघपाल सरदार यांनी मानले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

